गोवा सरकार

# महिला आणि बाल विकास संचालनालय

जुनी शिक्षण विभाग इमारत, २ रा मजला, १८ जून रस्ता, पणजी, गोवा ४०३००१
www.dwcd.goa.gov.in ई-मेल: dir-wcd.goa@nic.in
फोन : (०८३२) २२३५३०८/२४२६११२ फॅक्स : (०८३२) २४२४२३८

क्र. २-१५१-१३-आयसीडीएस/बाल संगोपन केंद्र डब्ल्यू/एच/७३३४ दिनांकः २४/११/२०२५

## जाहिरात क्र. १/२०२५ – बाल संगोपन केंद्र कर्मचारी/मदतनीस

बाल संगोपन केंद्र कर्मचारी / बाल संगोपन केंद्र मदतनीस या रिक्त पदांसाठी पात्र महिला उमेदवारांकडून कोऱ्या कागदावर आपले नाव, वडिलांचे/पतीचे नाव, पत्ता, वय, शिक्षण, फोटो, अनुभव असल्यास इ. चा तपशील नमूद केलेल्या स्वरूपात अर्ज मागवण्यात येत आहेत. सदर जागा ह्या परिशिष्ट -I मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्णतः मानद (ऑनररी) तत्त्वावर भरण्यात येतील, या पदांसाठी मासिक मानधन हे बाल संगोपन केंद्र कर्मचारी या पदाकरिता रु. ५,५००/- आणि बाल संगोपन केंद्र मदतनीस या पदासाठी रु. ३,०००/- असे असेल. सदर बाल संगोपन केंद्र कर्मचारी / मदतनीस यांनी प्रती दिवस ७ १/२ तास काम करणे आवश्यक आहे.

**पात्रता निकष :**

**पात्रता : बाल संगोपन केंद्र कर्मचारी :** उमेदवार इ. १२ वी उत्तीर्ण असावी, इयत्ता १० वी उत्तीर्ण पर्यंत शिथिलता. जर उमेदवार उपलब्ध असल्यास आणि सदर पदाकरिता पात्र असल्यास प्रथम प्राधान्य हे इ. १२ वी उत्तीर्ण उमेदवारास देण्यात येईल.

जर इ. १२ वी उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध न झाल्यास, जर उमेदवार उपलब्ध असल्यास आणि सदर पदाकरिता पात्र असल्यास द्वितीय प्राधान्य हे इ. १० वी उत्तीर्ण उमेदवारास देण्यात येईल.

**बाल संगोपन केंद्र मदतनीस :** उमेदवार इ. १० वी उत्तीर्ण असावी, इयत्ता ८ वी उत्तीर्ण पर्यंत शिथिलता. जर उमेदवार उपलब्ध असल्यास आणि सदर पदाकरिता पात्र असल्यास प्रथम प्राधान्य हे इ. १० वी उत्तीर्ण उमेदवारास देण्यात येईल. जर इ. १० वी उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध न झाल्यास, जर उमेदवार उपलब्ध असल्यास आणि सदर पदाकरिता पात्र असल्यास द्वितीय प्राधान्य हे इ. ८ वी उत्तीर्ण उमेदवारास देण्यात येईल.

**वय :** उमेदवार १८-३५ वर्षे वयोगटातील असावी.

**रहिवास :** उमेदवार ही संबंधित गटातील रहिवासी असावी.

कोऱ्या कागदावरील अर्ज हा आयसीडीएस (गट) च्या संबंधित सीडीपीओ, प्रकल्प / तालुका यांना उद्देशून लिहिलेला असावा आणि त्यासोबत पुढील आवश्यक कागदपत्रे जोडलेली असावीत :

१) गोवा राज्यातील १५ वर्षे रहिवासाचे प्रमाणपत्र
२) वयाचा पुरावा / जन्म प्रमाणपत्र
३) मतदान ओळखपत्र
४) आधार कार्ड
५) शैक्षणिक पात्रता पुराव्याच्या प्रती
६) जातीचा दाखला (असल्यास)
७) अनुभवाचा दाखला (असल्यास)

मंत्रालयाकडून विहित करण्यात आल्याप्रमाणे बाल संगोपन केंद्र कर्मचारी या पदाकरिता इ. १२ वी उत्तीर्ण उमेदवार आणि बाल संगोपन केंद्र मदतनीस या पदाकरिता इ. १० उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे सदर पात्रता ही अनुक्रमे इ. १० वी उत्तीर्ण व इ. ८ वी उत्तीर्ण अशी शिथिल करण्यात आलेली आहे.

समर्थनार्थ कागदपत्रांसह असलेला अर्ज हा ज्या संबंधित गटामध्ये अंगणवाडी येत असेल त्या संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना **दि. १२/१२/२०२५** रोजी सायंकाळी ४.०० वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचणे आवश्यक आहे.

मुलाखतीसाठी पात्र असलेल्या उमेदवारांच्या नावांची यादी त्यांच्या मुलाखतीच्या तारखांसह सीडीपीओ यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर **दि. ०२/०१/२०२६** रोजी प्रदर्शित करण्यात येईल. या मुलाखतींसाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

बाल संगोपन केंद्र कर्मचारी / मदतनीस यांची निवड ही त्यांच्या वैद्यकीय स्वास्थ्यावर अवलंबून राहील.

**सही/-**
**(ज्योती देसाई)**
**संचालक**
**महिला आणि बाल विकास संचालनालय**

| अनु. क्र. | अंगणवाडी केंद्राचे नाव | अंगणवाडी केंद्राचा पत्ता | बाल संगोपन केंद्र कर्मचारी | बाल संगोपन केंद्र मदतनीस |
|---|---|---|---|---|
| I | **आयसीडीएस पेडणे, शासकीय संकुल, पेडणे, फोन क्र.: २२०१२५३** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. २४, भिरोंडा, पेडणे | जीपीएसच्या नजीक, भिरोंडा, पेडणे, गोवा | ०१ | ०१ |
| II | **आयसीडीएस बार्देस, म्हापसा बाजार सब यार्ड बिल्डिंग, म्हापसा, फोन क्र.: २२६२९६३** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ६३, पोलीस क्वार्टर्स | बी -IX - २ टाइप बी क्वार्टर्स, पर्वरी, गोवा | ०१ | ०१ |
| III | **आयसीडीएस डिचोली, २ रा मजला, शासकीय बहुउद्देशीय इमारत, लेफ्ट विंग, डिचोली फोन क्र.: २३६२१७९** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ८०, वडाचा वाडा | वडाचा वाडा, बोर्डे, डिचोली, गोवा | ०१ | ०१ |
| IV | **आयसीडीएस सत्तरी, शासकीय कार्यालय संकुल, सत्तरी, फोन क्र.: २३७४२३५** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. १०१, बेतकीकरवाडा | वाळपई, सत्तरी, गोवा | ०१ | ०१ |
| V | **आयसीडीएस तिसवाडी, जुंता हाउस, १ ली लिफ्ट, १ ला मजला, पणजी, फोन क्र.: २२२२५६२** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ९३, बोक दि व्हाक | साईबाबा मंदिराच्या नजीक, पणजी, गोवा | ०१ | ०१ |
| VI | **आयसीडीएस सांगे, मडगाव अर्बन को-ऑप. बँकेच्या समोर, सांगे-गोवा, फोन क्र.: २६०४२२६** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ७९, तारीमळ, सांगे | सांगे, गोवा | ०१ | ०१ |
| VII | **आयसीडीएस केपे, शासकीय संकुल इमारत, केपे, फोन क्र.: २६६२२५१** | | | |
| १ | जीपीएस एडब्ल्यूसी क्र. ८०, कोंडी | दियाव, कुस्मण, केपे मासळी मार्केटच्या नजीक, केपे, गोवा | ०१ | ०१ |
| VIII | **आयसीडीएस सालसेत, ४ था मजला, जुनी जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, मडगाव-गोवा, फोन क्र.: २७१४०८३** | | | |
| १ | जीपीएस एडब्ल्यूसी क्र. ९, सावरकट्टा | सावरकट्टा, सालसेत, गोवा | ०१ | ०१ |
| IX | **आयसीडीएस काणकोण, शासकीय संकुल, काणकोण, गोवा, फोन क्र.: २६४३३३०** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ४८, भिकरवाडा | भिकरवाडा, काणकोण, गोवा | ०१ | ०१ |
| X | **आयसीडीएस मुरगाव, भटकळकर बिल्डिंग, २ रा मजला, वास्को द गामा, फोन क्र.: २५१८०६१** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. ६२, आदर्श नगर | आदर्श नगर, चिखली, मुरगाव | ०१ | ०१ |
| XI | **आयसीडीएस फोंडा, शासकीय इमारत, नगरपालिका उद्यानाच्या नजीक, फोंडा, गोवा, फोन क्र.: २३१३०२८** | | | |
| १ | एडब्ल्यूसी क्र. १६०, यशवंत नगर | यशवंत नगर, तिस्क, फोंडा, गोवा | ०१ | ०१ |

डीआय/एडीव्हीटी/१८९६/२०२५

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner